**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

---

**विषय क्रमांक : ४२** **दिनांक :- २४/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्र.१० दिनांक ११/०१/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.११ दिनांक२७/०१/२०२२ ,मा.स्थायी समिती सभा क्र.१२ दिनांक १०/०३/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.१३ दिनांक ११/०३/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.१ दिनांक १८/०४/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.२ दिनांक २६/०५/२०२२ ,मा.स्थायी समिती सभा क्र.३ दिनांक १०/०६/२०२२ रोजीच्या सभांचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका नगरसचिव विभाग

मा.स्थायी समिती सभा क्र.१० दिनांक ११/०१/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.११ दिनांक२७/०१/२०२२ ,मा.स्थायी समिती सभा क्र.१२ दिनांक १०/०३/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.१३ दिनांक ११/०३/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.१ दिनांक १८/०४/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.२ दिनांक २६/०५/२०२२ ,मा.स्थायी समिती सभा क्र.३ दिनांक १०/०६/२०२२ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---**---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मागील सभेचे इतिवृत्ताचे वाचन करा.

मागील सभा क्र. १०,११,१२,१३,१,२,व ३ या सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्र.३ दिनांक १०/०६/२०२२, विषय क्र.३७ मध्ये चाहुराणा बुद्रुक ४६ /१ या जागेमध्ये गोरगरीब रूग्णांसाठी रूग्णालय बांधणे बाबतचा विषय होता.सदर रूग्णालयाची जागा ही आरक्षीत कशासाठी आहे.या बाबतची माहिती चर्चे मध्ये आलेली नाही किंवा ऐकण्यात आलेली नाही.आरक्षणा बाबतचा खुलासा करण्यात यावा.

सहाय्यक संचालक नगररचनाकार श्री.चारठाणकर :- प्रस्तावीत रूग्णालय बांधणेच्या जागेवर आरक्षण असले बाबत मा.शहर अभियंता यांनी सांगीतले होते.परंतु त्याठिकाणी कोणत्याही प्रकरचे आरक्षण नाही.

मा.श्री.गणेश कवडे :- मागील सर्व सभांचे इतिवृत्त कायम करण्यात यावे.यामधील सभा क्र.३ दिनांक १०/०६/२०२२ रोजीच्या विषय क्र.३७ मधील चर्चे मध्ये प्रभाग समिती क्र.४ मध्ये २ एकर जागेचा भुखंड असुन या जागेवर महानगरपालिकेचे नियोजीत हॉस्पीटल होणार असल्याने या जागेवर प्रायमरी शाळेचे आरक्षण नसल्याचे सहाय्यक संचालक नगररचनाकार श्री.चारठाणकर यांनी सभेमध्ये माहिती दिल्यानुसार या विषयातील चर्चे मधील आरक्षण नसलेबाबतच्या फेरबदलास मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- सहाय्यक संचालक नगररचनाकार श्री.चारठाणकर यांनी सभेमध्ये माहिती दिल्यानुसार या विषयातील चर्चे मधील आरक्षण नसलेबाबतच्या फेरबदलास मान्यता देण्यात यावी.सर्व सभांचे इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्र.१० दिनांक ११/०१/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.११ दिनांक२७/०१/२०२२ ,मा.स्थायी समिती सभा क्र.१२ दिनांक १०/०३/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.१३ दिनांक ११/०३/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.१ दिनांक १८/०४/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.२ दिनांक २६/०५/२०२२, सभा क्र.३ दिनांक १०/०६/२०२२ रोजीच्या विषय क्र.३७ मधील चर्चे मध्ये प्रभाग समिती क्र.४ मध्ये २ एकर जागेचा भुखंड असुन या जागेवर महानगरपालिकेचे नियोजीत हॉस्पीटल होणार असल्याने या जागेवर प्रायमरी शाळेचे आरक्षण नसल्याचे सहाय्यक संचालक नगररचनाकार श्री.चारठाणकर यांनी सभेमध्ये माहिती दिली.त्यानुसार, या विषयातील चर्चे मधील आरक्षण नसलेबाबतच्या फेरबदलास मान्यता देण्यात येत आहे.तसेच सर्व सभांचे कार्यवृत्त कायम करण्यात येत आहे.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्र.१० दिनांक ११/०१/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.११ दिनांक२७/०१/२०२२ ,मा.स्थायी समिती सभा क्र.१२ दिनांक १०/०३/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.१३ दिनांक ११/०३/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.१ दिनांक १८/०४/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.२ दिनांक २६/०५/२०२२, सभा क्र.३ दिनांक १०/०६/२०२२ रोजीच्या विषय क्र.३७ मधील चर्चे मध्ये प्रभाग समिती क्र.४ मध्ये २ एकर जागेचा भुखंड असुन या जागेवर महानगरपालिकेचे नियोजीत हॉस्पीटल होणार असल्याने या जागेवर प्रायमरी शाळेचे आरक्षण नसल्याचे सहाय्यक संचालक नगररचनाकार श्री.चारठाणकर यांनी सभेमध्ये माहिती दिली.त्यानुसार, या विषयातील चर्चे मधील आरक्षण नसलेबाबतच्या फेरबदलास मान्यता देण्यात येत आहे.तसेच सर्व सभांचे कार्यवृत्त कायम करण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

---

**विषय क्रमांक : ४३** **दिनांक :- २४/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.रेणुका प्रणव जोशी यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर घेणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ :-** कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र. ९३४ दि. १४/०३/२०२२ चा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी त्यांचेकडील जा. क्र. कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना ९३४ दि. १४/०३/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि. २९/०७/२०२१ ते २८/०१/२०२२ अखेर असुन सदरची मुदत ही दि. २९/०१/२०२२ रोजी पासुन समाप्त झालेली असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवुन दि. ०१/०२/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत." सुचित केलेले आहे. सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती ठराव क्रं. ९६ दि. २०/०९/२०२१ च्या पुर्व मान्यता पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ३३३७ दि. २१/१०/२०२१ अन्वये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांची रु. २८,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. २९/०७/२०२१ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि. २९/०१/२०२२ रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दिनांक ०१/०२/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये २८,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,मुलअ व अलेप यांचा अीाप्राय घ्यावा.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.२००५/प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५/०८/२००५ मधील परि-०५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घेण्यात यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी

नियुक्त्या कराव्या लागल्यावर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी. असे नमुद केले आहे.प्रस्तावित वैद्यकीय अधिकारी या पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.तसेच प्रस्तावात मुळ नियुक्ती दिनांक नमुद करण्यात यावा.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,अं.ले.प.यांच्या अभिप्रायानुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्र.वैद्यकीय अधिक्षक यांचे दि.०५/०३/२०२२चे पुर्ननियुक्ती शिफारसीनुसार व प्रस्तावित "अ" नुसार पुढील कार्यवाही करणेस व मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावित केल्यानुसार मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब : - कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.रेणुका प्रणव जोशी यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर घेणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.परसराम गायकवाड :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.परसराम गायकवाड :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.रेणुका प्रणव जोशी यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर घेणे बाबतचा ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दिनांक ०१/०२/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.परसराम गायकवाड सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

---

**विषय क्रमांक : ४४** **दिनांक :- २४/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुत्या स्वरूपात अर्चना संदिप क्षत्रीय व इतर परिचारीका यापदी तांत्रिक खंड देवुन अटी शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबत ऑफीस रिपोर्ट

**संदर्भ :-** १) मा. स्थायी समिती ठराव क्रं. १४२ दिनांक ११/०१/२०२२ अन्वयेच्या मानधनवाढी बाबतचा पारीत ठराव

२) कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा. क्र.८९ दि.०९/०५/२०२२ चा प्रस्ताव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी त्यांचेकडील जा. क्र. कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना ८९ दि. ०९/०५/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये "कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी अर्चना संदीप क्षत्रीय यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि. २४/१२/२०२१ पासून सहा महिन्यांकरिता असुन सदरची मुदत ही दि. २३/०५/२०२२ रोजी पासुन समाप्त झालेली असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवुन दि. २७/०५/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत." सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती ठराव क्रं. १५१ दि. ११/०१/२०२२ च्या पुर्व मान्यता पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक ३९४ दि. ०४/०२/२०२२ अन्वये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी अर्चना संदिप क्षत्रिय यांची रु. १३,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. २४/१२/२०२१ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि. २४/०६/२०२२ रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

दरम्यानच्या काळात कै.बाळसाहेब देशपांडे दवाखान्यामधील तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी दरमहा मानधनावर नियुक्तीकरिता १० % प्रमाणे दरमहा मानधन वाढ करणेबाबतचा प्रस्ताव निर्णयाकरिता मा.स्थायी समितीकडे इकडील जा.क्र.आस्था. ३५१० दि.०८/११/२०२१ अन्वये पाठविण्यात आलेला होता, त्यानुषंगाने मा. स्थायी समिती ठराव क्रं. १४२ दिनांक ११/०१/२०२२ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत करुन मान्यता दिलेली आहे.

" कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरिता करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदांवरील नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे. तसेच त्यांच्या सध्याच्या मानधनामध्ये रक्कम रुपये ४५% ने वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे, खर्च मंजुर."

यापुर्वी अहमदनगर महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना वैद्यकीय अधिकारी यांचे प्रस्तावाच्या अनुषंगाने तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी सहा महिन्याकरिता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर नियुक्ती बाबत वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवून थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखती होवून निवड झालेल्या संबधितांची कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरिता मानधनावर नियुक्ती बाबत कार्यवाही

करण्यात आलेली होती, तद्नंतर वैद्यकीय अधिकारी यांचेकडील सादर झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने तांत्रिक खंड देवून मा. स्थायी समितीच्या मंजुरी प्राप्त ठरावाच्या अनुषंगाने वेळोवेळी सहा - सहा महिन्यांकरिता मानधनावर नियुक्ती बाबत कार्यवाही करण्यात येत असून संबधित परिचारीका यांची यापुर्वी केलेल्या मानधनामध्ये वाढ बाबतची माहीती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नियुक्ती आदेश क्रं.दि. | दरमहा मानधन रु. | केव्हा पासून मानधन वाढ दि. | मा.स्था.स.ठ.क्रं.दि. |
|---|---|---|---|---|
| १ | ५६२९/२६/१०/२०१५ | ८,०००/- | दि. २६/१०/२०१५ पासून | वर्तमान पत्रामधील प्रसिध्द जाहिरातीच्या अनुषंगाने मा. आयुक्त यांचे मान्यतेने. |
| २ | ५९ / ०४/०४/२०१८ | १०,०००/- | दि. ०६/०२/२०१८ पासून | मा. स्था. स. ठ. क्रं. ६८ दि. ०६/०२/२०१८ चा पारीत ठराव. |
| ३ | ७२२/११/०३/२०२० | १३,०००/- | दि. १९/११/२०१९ पासून | मा. स्था. स. ठ. क्रं. १३९ दि. १७/०१/२०२० चा पारीत ठराव. |

दरम्यानच्या काळात कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामधील तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी दरमहा मानधनावर नियुक्तीकरिता १०% प्रमाणे दरमहा मानधन वाढ करणे बाबत चा प्रशासकीय प्रस्ताव निर्णयाकरिता मा. स्थायी समितीकडे इकडील जा. क्र. आस्था. ३५१० दि.०८/११/२०२१ अन्वये पाठविण्यात आलेला होता, तथापि मा. स्थायी समिती ठराव क्रं. १४२ दिनांक ११/०१/२०२२ अन्वये संबधित तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यांचे दरमहा मानधनामध्ये थेट ४५% प्रमाणे वाढ करणेबाबत सुचित केलेले आहे, सद्यस्थितीमध्ये महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट आहे, त्यामुळे संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील ५३ च्या तरतुदीनुसार कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी अर्चना संदिप क्षत्रिय यांना तीन दिवसाच्या तांत्रिक खंड देवुन दिनांक २७/०६/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता यापुर्वीच्या मुळ प्रस्तावामध्ये नमूद केल्यानुसार दरमहा मानधनामध्ये १०% प्रमाणे वाढ करुन अटी व शर्ती प्रमाणे दरमहा रु. १४,३००/- या मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहा.आयुक्त ,आस्थापना यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावित प्रमाणे आदेशार्थ सादर.

मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मुळ नियुक्ती २०१५ पासून असुन केलेली मुदतवाढ व मानधन देण्याचे प्रयोजन काय ? विहीत पध्दतीने फेर नियुक्त्या का केल्या जात नाही?मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.२००५/प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५/०८/२००५ मधील परि-०५ मध्ये " सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घेण्यात यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यावर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी." असे नमुद केले आहे.प्रस्तावित परिचारीका पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करणे उचित राहिल.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मुलेप यांचे अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही करणेस मा.स्थायी समितीसमोर निर्णयार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,"अ" मध्ये प्रस्तावित केल्यानुसार निर्णयास्तव मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समितीसभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुत्या स्वरूपात अर्चना संदिप क्षत्रीय व इतर परिचारीका यापदी तांत्रिक खंड देवुन अटी शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबत ऑफीस रिपोर्ट.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.परसराम गायकवाड :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी अर्चना संदिप क्षत्रिय यांना तीन दिवसाच्या तांत्रिक खंड देवुन दिनांक २७/०६/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता यापुर्वीच्या मुळ प्रस्तावामध्ये नमूद केल्यानुसार दरमहा मानधनामध्ये १०% प्रमाणे वाढ करुन अटी व शर्ती प्रमाणे दरमहा रु. १४,३००/- या मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी अर्चना संदिप क्षत्रिय यांना तीन दिवसाच्या तांत्रिक खंड देवुन दिनांक २७/०६/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता यापुर्वीच्या मुळ प्रस्तावामध्ये नमूद केल्यानुसार दरमहा मानधनामध्ये १०% प्रमाणे वाढ करुन अटी व शर्ती प्रमाणे दरमहा रु. १४,३००/- या मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.परसराम गायकवाड सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

---

**विषय क्रमांक : ४५** **दिनांक :- २४/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुत्या स्वरूपात शितल गंगाराम शिंदे व तृप्ती रावसाहेब बडे यांची परिचारीका यापदी तांत्रिक खंड देवुन अटी शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबत ऑफीस रिपोर्ट

**संदर्भ :-** १) मा. स्थायी समिती ठराव क्रं. १४२ दिनांक ११/०१/२०२२ अन्वयेच्या मानधनवाढी बाबतचा पारीत ठराव

२) कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र. ९३५ दि. १४/०३/२०२२ चा प्रस्ताव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी त्यांचेकडील जा. क्र. कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना ९३५ दि. १४/०३/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये "कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी १) शितल गंगाराम शिंदे २) तृप्ती रावसाहेब बडे यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि. २७/०७/२०२१ पासून सहा महिन्यांकरिता असुन सदरची मुदत ही दि. २७/०१/२०२२ रोजी पासुन समाप्त झालेली असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवुन दि. ३०/०१/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती कर णेबाबत." सुचित केलेले आहे.सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती ठराव क्रं. १४७ दि. ११/०१/२०२२ च्या पुर्व मान्यता पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक ३९३ दि. ०४/०२/२०२२ अन्वये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी १) शितल गंगाराम शिंदे २) तृप्ती रावसाहेब बडे यांची रु. १३,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. २७/०७/२०२१ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि. २७/०१/२०२२ रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

दरम्यानच्या काळात कै.बाळसाहेब देशपांडे दवाखान्यामधील तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी दरमहा मानधनावर नियुक्तीकरिता १० % प्रमाणे दरमहा मानधन वाढ करणेबाबतचा प्रस्ताव निर्णयाकरिता मा.स्थायी समितीकडे इकडील जा.क्र.आस्था.३५१० दि.०८/११/२०२१ अन्वये पाठविण्यात आलेला होता, त्याअनुषंगाने मा. स्थायी समिती ठराव क्रं. १४२ दिनांक ११/०१/२०२२ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत करुन मान्यता दिलेली आहे.

" कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरिता करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदांवरील नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे. तसेच त्यांच्या सध्याच्या मानधनामध्ये रक्कम रुपये ४५% ने वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे, खर्च मंजुर."

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात

परिचारीका यापदी १) शितल गंगाराम शिंदे २) तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवून दिनांक ३०/०१/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता दरमहा मानधनामध्ये ४५% वाढ करून अटी व शर्ती प्रमाणे रूपये १८,८५०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे याबाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजूरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,"अ" मान्यतेस्तव

मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.२००५/प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५/०८/२००५ मधील परि-०५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घेण्यात यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यावर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी. असे नमुद केले आहे.प्रस्तावित परिचारीका या पदी तांत्रीक खंड पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" "ब" "क " प्रमाणे मंजूरीस्तव सादर

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, "अ" "ब" "क " "ड " मधील अभिप्रायानुसार निर्णयार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,चर्चा करा,चर्चा केली,फेर सादर करावे.

आस्थापना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,फेरसादर,उपरोक्त प्रकरणांवरील मा.अतिरीक्त आयुक्त साहेब यांचे दि.२९/०४/२०२२ रोजीचे शेरांकनानुसार दि.२९/०४/२०२२ रोजी झालेल्या चर्चा च्या अनुषंगाने की,वैद्यकीय अधिकारी यांचे प्रस्तावाच्या अनुषंगाने तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर नियुक्ती बाबत वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवून थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखती होवून निवड करण्यात आलेली होती,तद्नंतर वैद्यकीय अधिकारी यांचेकडील सादर झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने तांत्रिक खंड देवून मा.स्थायी समितीच्या मंजूरी प्राप्त ठरावाच्या अनुषंगाने वेळोवेळी सहा - सहा महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती बाबत कार्यवाही करण्यात येत असून संबधित परिचारीका यांची यापुर्वी केलेल्या मानधनामध्ये वाढ बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नियुक्ती आदेश क्र./दि | दरमहा मानधन रू | केव्हा पासून मानधन वाढ दि. | मा.स्था.स.ठ.क्र.दि. |
|---|---|---|---|---|
| १ | ६६७२/२३/१२/२०१४ | ८,०००/- | दि.२३/१२/२०१४ पासून | मा.आयुक्त यांचे मान्यतेने |
| २ | २४५/१६/०४/२०१८ | १०,०००/- | दि.०६/०२/२०१८ | मा.स्था.स.ठ.क्र.६८ दि.०६/०२/२०१८ चा पारित ठराव |
| ३ | १६८५/०६/०८/२०२० | १३,०००/- | दि.१५/०७/२०१९ | मा.स्था.स.ठ.क्र.३७ दि.०९/१०/२०२० चा पारित ठराव |

दरम्यान काळात कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामधील तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी दरमहा मानधनावर नियुक्तीकरिता १०%प्रमाणे दरमहा मानधन वाढ करणे बाबतचा प्रशासकीय प्रस्ताव निर्णयाकरिता मा.स्थायी समितीकडे इकडील जा.क्र.आस्था.३५१० दि.०८/११/२०२१ अन्वये पाठविण्यात आलेला होता,तथापि मा.स्थायी समिती ठराव क्र.१४२ दि.११/०१/२०२२ अन्वये संबधित तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यांचे दरमहा मानधनामध्ये ४५% प्रमाणे वाढ करणे बाबत सुचित केलेले आहे,सद्यस्थितीमध्ये महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट आहे,त्यामुळे संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरिता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार

तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १) शितल गंगाराम शिंदे २) तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवून दिनांक ३०/०१/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता यापुर्वीच्या मुळ प्रस्तावामध्ये नमूद केल्यानुसार दरमहा मानधनामध्ये १०% प्रमाणे वाढ करून अटी व शर्ती प्रमाणे दरमहा रू.१४,३००/- या मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजूरी मिळणे कामी निर्णयासाठी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केल्यानुसार मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुत्या स्वरूपात शितल गंगाराम शिंदे व तृप्ती रावसाहेब बडे यांची परिचारीका यापदी तांत्रिक खंड देवुन अटी शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबत ऑफीस रिपोर्ट

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.परसराम गायकवाड :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरिता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १) शितल गंगाराम शिंदे २) तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवून दिनांक ३०/०१/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता यापुर्वीच्या मुळ प्रस्तावामध्ये नमूद केल्यानुसार दरमहा मानधनामध्ये १०% प्रमाणे वाढ करून अटी व शर्ती प्रमाणे दरमहा रू.१४,३००/- या मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरिता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १) शितल गंगाराम शिंदे २) तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवून दिनांक ३०/०१/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता यापुर्वीच्या मुळ प्रस्तावामध्ये नमूद केल्यानुसार दरमहा मानधनामध्ये १०% प्रमाणे वाढ करून अटी व शर्ती प्रमाणे दरमहा रू.१४,३००/- या मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.परसराम गायकवाड सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

**विषय क्रमांक : ४६** **दिनांक :- २४/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता वैदयकीय अधिकारी ,लॅब टेक्निशीयन,स्टाफ नर्स ,जनसंपर्क अधिकारी या पदावर करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे व जनसंपर्क अधिकारी यांचे मानधनामध्ये वाढ करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**संदर्भ :-** १. मा.आयुक्त सांच्या दिनांक ०३/०५/२०२१ रोजीच्या मंजुर प्रस्तावानुसार
२.मा.आयुक्त यांच्या दिनांक २९/१०/२०२१ रोजीच्या मंजुर प्रस्तावानुसार
३.रक्तपेढी आवक क्र.२१ दिनांक १३/४/२०२२

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येते की,अहमदनगर महानगरपालिकेमधील रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार खालील तक्त्यात दर्शविलेल्या तात्पुरत्या स्वरूपात पदावर दिनांक ०४/०५/२०२१ व दिनांक १९/०५/२०२१ पासुन सहा महिन्यांकरिता खालील अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द करण्यात आले आहे.त्यानुसार संदर्भीय क्र.०१ मंजुरीनुसार रक्तपेढी जा.क्र.१०० दि.०४/०५/२०२१ व जा.क्र.१०७ दि.१८/०५/२०२१ अन्वये खालील प्रमाणे कर्मचारी यांना मानधनावर नियुक्त करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | रूजु करण्यात आलेले दिनांक | कामाची अंतिम कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.डॉ.सोमनाथ जयराम नंदकर | वैद्यकीय अधिकारी | १९/०५/२०२१ | १७/११/२०२१ |
| २ | सौ.सुनिता संपत पवार | लॅब टेक्निशियन | ०४/०५/२०२१ | ०३/११/२०२१ |
| ३ | सौ.स्नेहल अशोक गायकवाड | स्टाफ नर्स | ०४/०५/२०२१ | ०३/११/२०२१ |
| ४ | सौ.योगिता सुहास गायकवाड | स्टाफ नर्स | ०४/०५/२०२१ | ०३/११/२०२१ |
| ५ | श्री.संतोष भाउसाहेब काळे | जन संपर्क अधिकारी | ०४/०५/२०२१ | ०३/११/२०२१ |

वरील प्रमाणे कर्मचारी यांची कामाची मुदत दिनांक १७/११/२०२१ व ०३/११/२०२१ अखेर संपुष्टात आली असता संदर्भीय क्र.०२ मंजुरीनुसार रक्तपेढी जा.क्र.१६८ दि.०८/११/२०२१ व जा.क्र.१६९ दि.०८/११/२०२१ अन्वये खालील प्रमाणे कर्मचारी यांना पुर्ननियुक्ती बाबत आदेश देण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | रूजु करण्यात आलेले दिनांक | कामाची अंतिम कालावधी | अंदाजे सहा महिन्या करीता खर्च रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.डॉ.सोमनाथ जयराम नंदकर | वैदयकिय अधिकारी | २१/११/२०२१ | २०/०५/२०२२ | ४,५०,०००/- |
| २ | सौ.सुनिता संपत पवार | लॅब टेक्निशियन | ०७/११/२०२१ | ०६/०५/२०२२ | १,०२,०००/- |
| ३ | सौ.स्नेहल अशोक गायकवाड | स्टाफ नर्स | ०७/११/२०२१ | ०६/०५/२०२२ | १,२०,०००/ |
| ४ | सौ.योगिता सुहास गायकवाड | स्टाफ नर्स | ०७/११/२०२१ | ०६/०५/२०२२ | १,२०,०००/ |
| ५ | श्री.संतोष भाउसाहेब काळे | जन संपर्क अधिकारी | ०७/११/२०२१ | ०६/०५/२०२२ | ९६,०००/- |
| | | एकुण :- | | | ८,८८,०००/- |

"अ"

माञ वरील प्रमाणे अनुक्रमे ०१ यांची मुदत दिनांक २०/०५/२०२२ रोजी संपुष्टात येत असून अनुक्रमे ०२ ते ०५ कर्मचारी यांचे दिनांक ०६/०५/२०२२ अखेर संपुष्टात येणार आहे.त्याकरिता रक्तपेढीतील अत्यावश्यक कामासाठी पुढील सहा महिने करीता दोन दिवस तांत्रिक खंड देवून पुर्ननियुक्ती देणे उचित राहिल.

"ब"

त्याच प्रमाणे उक्त कर्मचारी पैकी श्री.संतोष भाउसाहेब काळे ,जनसंपर्क अधिकारी यांनी दिनांक ०३/०२/२०२२ रोजी अर्ज देवून सध्या रक्कम रू.१६,०००/- असे आहे.मात्र कामाचे अनुभव पहाता व राष्ट्रीय आरोग्य अभियान,महाराष्ट्र यांचेकडील मानधन हे रक्कम रू.२०,०००/- असे आहेत.त्यानुसार श्री.संतोष भाउसाहेब काळे ,जनसंपर्क अधिकारी मानधन देणे बाबत मागणी दर्शवली आहे.

वरील प्रमाणे अनुक्रमे ०१ ते ०५ कर्मचारी यांना सहा महिन्या करीता पुर्ननियुक्ती कामी अंदाजे एकुण रक्कम रू.८,८८,०००/- खर्च अपेक्षित आहे.त्याप्रमाणे श्री.संतोष भाउसाहेब काळे,जन संपर्क अधिकारी यांच्या मागणीनुसार दर महा वेतन वाढ रक्कम रू.४,०००/- प्रमाणे सहा महिन्याचे रक्कम रू.२४,०००/-वाढ पाहाता एकुण रक्क्म रू.९,१२,०००/-खर्च अपेक्षित आहे.

तथापी वरील प्रमाणे अनुक्रमे ०१ते ०५ कर्मचारी यांची पुर्ननियुक्ती देणे व श्री.संतोष भाउसाहेब काळे ,जनसंपर्क अधिकारी यांचे राष्ट्रीय आरोग्य अभियान,महाराष्ट्र यांचेकडील मानधनानुसार मानधन वाढ करणेकामी मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकामी व सदरील कर्मचारी यांना नियुक्ती ओदेश देणेकामी मान्यतेस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे रक्त संक्रमण अधिकारी यांचा अहवाल असे.

यावर मा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे माहे मे.२०२२ मध्ये १ वैदय,१ लॅब टेक्निशीयन ,२ स्टाफ नर्स ,१ पी.आर.ओ.पदे एकुण कर्मचारी यांची दुसरी पुर्ननियुक्ती ६ महिन्याची मुदत संपत आहे.त्यांचे काम समाधानकारक आहे.त्यांचे अत्यावश्यक वैदयकीय रक्तपेढी --- आवश्यकता असल्याने ,सर्व कर्मचारी यांना पुढील ६ महिने पुर्ननियुक्ती देणेस प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मंजूरीघेणे कामी प्रस्ताव मान्यतेस तसेच पी.आर.ओ.श्री.काळे यांनी माधनध वाढीसाठी विनंती केली असून रू.१६,०००/- मानधन रक्कम नॅशनल पी.आर.ओ.माधनधाप्रमाणे २०,०००/- रूपये मानधन मागणी केली आहे.तथापी या बाबत

मानधन रूपये २०,०००/- करणेस शिफारस आहे.तथापी मान्यतेस्तव स्थायी समिती पुढे ठेवणेस प्रशासकीय मंजूरीस सविनय सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार मान्यतेस्तव

मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.२००५/प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५/०८/२००५ मधील परि-०५ मध्ये " सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घेण्यात यावी, अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यावर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी." असे नमुद केले आहे.प्रस्तावित अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरूपात पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून तसेच संतोष भाउसाहेब काळे मानधन वाढीबाबत विभागाने आपले स्तरावर उचित निर्णय घ्यावा.

यावर मा.उपायुक्त(कर) यांचा अभिप्राय की,"अ " प्रमाणे मान्यतेस्तव.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,खर्चाच्या लेखाशिर्षासह तरतुदीसह सादर करणे.

यावर रक्त संक्रमण अधिकारी ,रक्तपेढी विभाग यांचा अभिप्राय की,उपरोक्त विषयानुसार मा.आयुक्त यांच्या दिनांक ११/०५/२०२२ रोजीच्या सुचनेनुसार फेर सादर करण्यात येते की,रक्तपेढी विभागामार्फत सन २०२२-२३ या वर्षाकरीता लेखाशिर्ष - रक्तपेढी विभागातील मानधन कर्मचारी डॉक्टर,लॅब टेक्नीशीयन,जनसंपर्क अधिकारी व परिचारीका नविन हेड तयार करण्यात येवून सदर कामी तरतुद रक्कम रू.६६,००,०००/- ठेवण्यात आलेली आहे.त्यानुसार सदर कामाकरिता खर्चाच्या लेखाशिर्ष तरतुदीसह खली नमुद करून फेरसादर करण्यात येत आहे.

तथापी वरील प्रमाणे अनुक्रमे ०१ते ०५ कर्मचारी यांची पुर्ननियुक्ती देणे व श्री.संतोष भाउसाहेब काळे ,जनसंपर्क अधिकारी यांचे राष्ट्रीय आरोग्य अभियान,महाराष्ट्र यांचेकडील मानधनानुसार मानधन वाढ करणे कामी मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकामी व सदरील कर्मचारी यांना नियुक्त आदेश देणे कामी मान्यतेस्तव सविनय सादर.

सन २०२२ -२३ प्रस्तावित बजेट पान नं.१५/१

लेखाशिर्ष :- रक्तपेढी विभागातील मानधन कर्मचारी,डॉक्टर,लॅब टेक्नीशीयन ,जनसंपर्क अधिकारी व परिचारीका

तरतुद :- ६६,००,०००/-

पुर्वीचा खर्च :- निरंक

बिल खर्च :- ९,१२,०००/-

२ व ३ ची बेरीज:- ९,१२,०००/-

शिल्लक :- ५६,८८,०००/-

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, "अ" बाबत निर्णयार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता वैदयकीय अधिकारी ,लॅब टेक्निशीयन,स्टाफ नर्स ,जनसंपर्क अधिकारी या पदावर करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पर्ननियुक्ती करणे व जनसंपर्क अधिकारी यांचे मानधनामध्ये वाढ करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करताना ऑर्डर नसतानाही काही कर्मचारी काम करतात.काम करते वेळी त्यांचे जिवीतास काही अपघात झाला तर याची जबाबदारी कोण घेणार.कामाची ऑर्डर नसतांना काम केले तर जबाबदारी कोणाची.संबंधित कर्मचा-याची मुदत संपण्यापुर्वीच पुढील मुदत वाढीचा प्रस्ताव एक महिना अगोदरच ठेवण्यात यावा.

मा.श्री.विनीत पाऊलबुधे :- कंत्राटी कर्मचा-याची मुदत संपुण जाते मुदत संपल्यानंतर प्रस्ताव मंजूरीसाठी येतो.मागील मुदतीची मंजूरी कशी देणार.

मा.उपायुक्त श्री.कुरे :- कंत्राटी कर्मचा-याची मुदत संपण्यापुर्वीच पुर्ननियुक्तीचा प्रस्ताव ठेवण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- कंत्राटी कर्मचा-याची नियुक्ती करतांना मुदत संपण्यापुर्वी पुर्ननेमणूकीचा प्रस्ताव एक महिना आगोदर आला नाही तर विभाग प्रमुखावर करवाई करण्यात येईल.

मा.उपायुक्त श्री.कुरे :- संबंधित विभागाने वेळेत प्रस्ताव सादर केला पाहिजे.

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी विभागाचे कामकाज कोण पहात आहे.महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय सभेमध्ये एखादया रूग्णाच्या नातेवाईकाने डोनर उपलब्ध करून दिल्यास त्यास मोफत रक्तपिशवी देण्यात येईल व डोनर नसल्यास त्यांचेकडून १०० रू.प्रतिबॅग दर आकारण्यात येईल असा ठराव पारित करण्यात आला होता.याची अदयापही अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

रक्तपेढी विभाग प्रमुख डॉ.शेडाळे :- आमच्याकडे अशा प्रकारचा ठराव आलेला नाही.

मा.श्री.विनीत पाऊलबुधे :- अर्थसंकल्पीय सभेमध्ये सदर ठराव रक्तपेढी बाबत दुरूस्ती करण्यात आलेली आहे.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिका सभेमध्ये सर्व सभासदांनी सदर विषयावर चर्चा करून रक्तपेढी संदर्भात सुधारणा करून ठराव पारित केलेला आहे.तुम्ही ठराव पाहुन घ्या ,त्या प्रमाणे तातडीने अंमलबजावणी सुरू करा.ठरावाप्रमाणे अंमलबजावणी केली नाही तर विभाग प्रमुखावर कार्यवाही करण्यात येईल.

रक्तपेढी विभाग प्रमुख डॉ.शेडाळे :- ठरावाची अंमलबजावणी करतो.

मा.सभापती साहेब :- मानधन वाढ करण्याचा ठराव आहे.सध्या किती मानधन देण्यात येत आहे.

रक्तपेढी विभाग प्रमुख डॉ.शेडाळे :- वैद्यकीय आरोग्य अधिकारी ७५ हजार रूपये ,लॅब टेक्नीशीयन १७ हजार रूपये ,नर्स २० हजार रूपये ,पी.आर.ओ.मानधन वाढीचा प्रस्ताव आहे.२० हजार रूपये मागणी केली आहे.

मा.सभापती साहेब :- पी.आर.ओ.काय काम करतात.

रक्तपेढी विभाग प्रमुख डॉ.शेडाळे :- पी.आर.ओ. स्वतःच्या गाडीवर फिरून महानगरपालिका हद्द व आजुबाजुच्या परिसरामध्ये रक्तसंकलनाचा कॅम्प राबवणे चे काम करतात.महिन्याला अंदाजे १५० बॅग रक्त संकलन होते.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- महानगरपालिका हद्दीत असलेल्या सेवाभावी संस्था(एन.जी.ओ.) यांच्याशी संपर्क साधून रक्तसंकलनाचे कॅम्प राबविण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- पी.आर.ओ.यांची कितवी पुर्ननियुक्ती आहे.कै.बा.दे.दवाखान्या करीता महिन्याला किती रक्त पिशव्यांची आवश्यकता असते.

रक्तपेढी विभाग प्रमुख डॉ.शेडाळे :- दुसरी पुर्ननियुक्ती आहे.पुर्वी सहा महिन्याची होती.आता एक वर्षाची करावयाची आहे.बा.दे.दवाखान्या करीता महिन्याला अंदाजे ७० बॅग लागतात.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.रूपाली वारे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता वैदयकीय अधिकारी ,लॅब टेक्निशीयन,स्टाफ नर्स ,जनसंपर्क अधिकारी या पदावर पुढील सहा महिने करीता दोन दिवस तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केलेल्या दिनांकापासून करण्यास व ऑफिस रिपोर्ट नुसार जनसंपर्क अधिकारी यांचे मानधनामध्ये वाढ करणेस मान्यता देण्यात येत आहे.सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार उपरोक्त नियुक्ती बाबतचे प्रस्ताव आस्थापना विभागामार्फत सादर करण्यात यावेत.

तसेच ब्लड बॅके मार्फत रक्ताच्या गटवारीनुसार सर्व पदाधिकारी, सर्व नगरसेवक ,यांना दैनंदिन रक्तपेढीमधील रक्त उपलब्धतेबाबत अहवाल देण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता वैदयकीय अधिकारी ,लॅब टेक्निशीयन,स्टाफ नर्स ,जनसंपर्क अधिकारी या पदावर पुढील सहा महिने करीता दोन दिवस तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केलेल्या दिनांकापासून करण्यास व ऑफिस रिपोर्ट नुसार जनसंपर्क अधिकारी यांचे मानधनामध्ये वाढ करणेस मान्यता देण्यात येत आहे.सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार उपरोक्त नियुक्ती बाबतचे प्रस्ताव आस्थापना विभागामार्फत सादर करण्यात यावेत.

तसेच ब्लड बॅके मार्फत रक्ताच्या गटवारीनुसार सर्व मा.पदाधिकारी, सर्व मा.नगरसेवक ,यांना दैनंदिन रक्तपेढीमधील रक्त उपलब्धतेबाबत अहवाल देण्यात यावा.

सुचक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

अनुमोदक :- मा.सौ.रूपाली वारे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

**विषय क्रमांक : ४७** **दिनांक :- २४/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका कोपरगांव- अहमदनगर रस्ता (रा.म.१०) देहरे रेल्वे भुयारी मार्गातील बाधीत जलवाहिन्या स्थलांतरीत करणे कामाचे शासन मान्यतेनुसार व्याज वापरणेस प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

विषयांकीत बाबत विनंती पूर्वक सादर की,कोपरगांव - अहमदनगर रस्ता (रा.म.१०) देहरे रेल्वे भुयारी मार्गातील बाधीत जलवाहिन्या स्थलांतरीत करणेच्या कामास जागतिक बॅक प्रकल्प विभाग,अहमदनगर यांचे कडून एकुण रक्कम रूपये १,६७,३९,८१०/-इतका खर्च अपेक्षित होता.

परंतु तांत्रिक अडचणी मुळे सदरचे कामास विलंब झालेला असून मा.आयुक्त यांचे मंजूरीने दि.३०/०८/२०१८ पर्यत पहिली मुदतवाढ ,दि.३०/१२/२०१८ पर्यत दुसरी मुदतवाढ व दि.३०/१०/२०१९ पर्यत तिसरी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.एकुण ३ तीन वेळेस मुदतवाढ दिले नंतर त्यांचेकडून काम पुर्ण करण्यात आले व त्यापोटी त्यानां एकुण चार धावते देयके मिळून एकुण रू.१,६६,०७,७४९/-इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

तसेच सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करताना उक्त कामाच्या ठिकाणची तळयातील काही खोदाई,डिवॉटरींग,कॉफरडॅम इत्यादी बाबी अंतर्भूत केलेल्या नव्हत्या.परंतु काम पर्ण करणे अनुषंगाने सदरची कामे करणे आवश्यक व क्रमप्राप्त असल्याने करून घेण्यात आलेली आहेत व त्यानुसार सदर कामाचे ठेकेदार मे.साई असोसिएटस,औरंगाबाद यांनी अतिरिक्त केलेल्या कामापोटीचे देयके मिळणेस मागणी केलेली होती.

या अनुषंगाने इकडील जा.क्र.शहर पा.पु.८६७ दि.२५/१०/२०२१ अन्वये मा.कार्यकारी अभियंता,जागतीक बॅक प्रकल्प विभाग,अहमदनगर यांना पत्र देवून अतिरिक्त कामाचे अंदाजपत्रकाचे जादा होणा-या बाबींचे रक्कम रू.१,४९,५४,७२९/- महानगरपालिकेस उपलब्ध करून दयावे तसेच उपरोक्त नमुद अतिरिक्त कामापोटी सदर कामाचे ठेकेदार यांना वरील शिल्लक व्याजातुन देयके अदा करण्यास (व्याज वापरण्यास) परवानगी मिळणेसाठी प्रशासकीय मान्यता मिळावी असे कळविण्यात आलेले होते.

या अनुषंगाने मा.मंत्री(सां.बा.)(सार्वजनिक उपक्रम वगळून) यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि.१५/०२/२०२२ रोजी दु.१२.३० वा.आढावा बैठक आयोजीत करण्यात आलेली होती.सदर बैठकीस अहमदनगर महानगपालिकेच्या वतीने पाणी पुरवठा विभाग प्रमुख म्हणून अभियंता श्री.सातपुते आर.जी.हे उपस्थित होते.

सदर बैठकीत झालेली चर्चा व निर्णय/ निर्देश खालील प्रमाणे आहेत.

प्रस्तावना जागतिक बॅक प्रकल्प विभाग,अहमदनगर अंतर्गत खाजगीकरणांतर्गत कोपरगांव कोल्हार अहमदनगर रस्ता प्ररामा ०८ किमी १२०/०० ते १७५/५३० मध्ये चौपदरीकरण करणे या प्रकल्पाचे बांधा वापरा व हस्तांतर करा या तत्वावर काम करण्यात आले होते.मौजे देहरे येथे (साखळी क्रमांक १५३/६००) रस्ता व रस्त्याच्या जवळ व समांतर असणारा रेल्वेमार्ग ओलांडण्यासाठी करण्यात येणा-या भुयारी मार्गामध्ये अहमदनगर महानगरपालिका यांची पाणी पुरवठा करणारी जलवाहिनीची पाईप लाईन अडथळा ठरत होती.त्यामुळे तिचे तातडीने स्थलांतर करणे क्रमप्राप्त होते.परंतु अहमदनगर महानगरपालिकेने सदरची जलवाहिनी स्वखर्चाने निधी अभावी स्थलांतरित करण्यास असमर्थता दर्शविली व सदरचे काम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागास जलवाहिनी स्थलांतरित करणेसाठी रू.१७९.५८ लक्ष निधीची मागणी केली.त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग,अहमदनगर यांनी सदरील

काम ठेव अंशदान स्वरूपात करण्या करिता महानगरपालिकेच्या मागणी नुसार निधीची रक्कम रू.१७९.५८ लक्ष फेब्रुवारी २०१६ मध्ये वर्ग केली.यावर महानगरपालिकेने जुन २०१७ मध्ये कामाचे कार्यारंभ आदेश दिलेले होते.

परंतु उक्त कामाच्या ठिकाणा वरील तळयातील कामी खोदाई ,डिवॉटरींग,कॉफरडॅम इत्यादी बाबी अंदाजपत्रकात अंतर्भुत केलेल्या नव्हत्या.परंतु काम पुर्ण करण्याच्या अनुषंगाने सदरची कामे करणे आवश्यक व क्रमप्राप्त असल्याने करून घेण्यात आलेली आहेत.असे महानगरपालिकेने कळवून या अतिरिक्त कामा पोटी रक्कम रूपये १४९.५५लक्ष सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी केलेली आहे.महानगरपालिकेकडे फेब्रुवारी २०१६ मध्ये ठेव म्हणून ठेवलेल्या रू.१७९.५८ लक्ष या रकमेवर आजमितीस रू.८२.१८ लक्ष इतके व्याज जमा झालेले असून ती रक्कम वापरण्यास परवानगी दयावी व उर्वरित रू.५१.६५ लक्ष सार्वजनिक बांधकाम विभागाने उपलब्ध करून दयावेत असे निवेदन मा.मंत्री महोदय यांचे समोर मांडण्यात आले.

निर्णय / निर्देश - "सदर वाढीव कामास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.अंशदान स्वरूपात ठेवण्यात आलेल्या रकमे वरील व्याज रू.८२.१८ लक्ष वापरण्यास अनुमती देण्यात आलेली आहे.उर्वरित रक्कम रू.५१.६५ लक्ष हे सार्वजनिक बांधकाम विभागा कडून महानगरपालिकेस उपलब्ध करून देण्याबाबत आदेशित करण्यात आले."

यास्तव विषयांकीत बाबत मा.मंत्री (सां.बा.)(सार्वजनिक उपक्रम वगळून ) यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि.१५/०२/२०२२ रोजी झालेल्या आढावा बैठकीतील "निर्णय/ निर्देश" प्रमाणे खालील प्रमाणे कार्यवाही करणेस प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सविनय सादर.

१)अंशदान स्वरूपात ठेवण्यास आलेल्या रक्कमे वरील व्याज रू.८२.१८ लक्ष वापरण्यास प्रशासकीय मंजूरी मिळणेस.
२)व्याजाच्या रक्कमेतून अतिरिक्त कामाचे बिल अदा करणेस.
३) रू.८२.१८ लक्ष व्याजाच्या रक्कमेतून अतिरिक्त कामाचे बिल अदा केले नंतर उर्वरित रक्कम रू.५१.६५ लक्ष सार्व.बांधकाम विभागाकडून म.न.पा.स उपलब्ध होणार असल्याने प्राप्त होणा-या रकमेतून अतिरिक्त कामाचे उर्वरित बिल अदा करणेस मान्यतेस्तव तथा मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,मा.मंत्री महोदयांच्या आढावा बैठकीतील निर्णयानुसार मान्यतेस सादर.

यावर मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,सार्वजनिक बांधकाम विभाग,महाराष्ट्र शासन यांचे दि.०८/०३/२०२२ चे पत्र क्र.खाक्षेस-२००५ प्र.क्र.१९५ / भाग -५ /रस्ते -९ च्या पत्रातील विषय क्र.१ च्या निर्णयानुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,"अ" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका कोपरगांव- अहमदनगर रस्ता (रा.म.१०) देहरे रेल्वे भुयारी मार्गातील बाधीत जलवाहिन्या स्थलांतरीत करणे कामाचे शासन मान्यतेनुसार व्याज वापरणेस प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.सभापती साहेब :- कामा बाबतची माहिती देण्यात यावी.

श्री.सातपुते,पाणी पुरवठा विभाग प्रमुख :- कोपरगांव- अहमदनगर रस्ता (रा.म.१०) देहरे रेल्वे भुयारी मार्ग येथे काम करणे आहे.त्या कामामध्ये महानगरपालिकेच्या येणा-या पाईप लाईन जलवाहीनीच्या स्थलांतरीत कामा करीता निधी हसतांतरीत करण्यात आला होता.सदरचा निधी सन २०१६-१७ मध्ये वर्ग झालेला आहे.सदर निधीवरील व्याज वापरावयास मंजूरी घ्यावयाची आहे.एस्टीमेंट मध्ये नसलेल्या वाढीव बाबी या रकमेमधून करावयाच्या

आहेत.वाढीव कामाचे पैसे आलेले नाहीत.अतिरीक्त कामा पोटी ठेकेदार यांना शिल्लक व्याजामधून देयक अदा करावयाचे आहे.उर्वरित रू.५० लक्ष रूपये येणार आहे.

मा.सभापती :-आणखी किती काम शिल्लक आहे.

श्री.निकम,जल अभियंता :- एका ठिकाणी काम अपुर्ण होते.त्या कामातली अडचण दूर केली असून दोन दिवसांमध्ये काम पुर्ण होईल.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.परसराम गायकवाड:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- .मौजे देहरे येथे (साखळी क्रमांक १५३/६००) रस्ता व रस्त्याच्या जवळ व समांतर असणारा रेल्वेमार्ग ओलांडण्यासाठी करण्यात येणा-या भुयारी मार्गामध्ये अहमदनगर महानगरपालिका यांची पाणी पुरवठा करणारी जलवाहिनीची पाईप लाईन स्थलांतर करणे या कामा करीता ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद अनुक्रमे १)अंशदान स्वरूपात ठेवण्यास आलेल्या रक्कमे वरील व्याज रू.८२.१८ लक्ष वापरण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.२)व्याजाच्या रक्कमेतून अतिरिक्त कामाचे बिल अदा करणेस.३) रू.८२.१८ लक्ष व्याजाच्या रक्कमेतून अतिरिक्त कामाचे बिल अदा केले नंतर उर्वरित रक्कम रू.५१.६५ लक्ष सार्व.बांधकाम विभागाकडून म.न.पा.स उपलब्ध होणा-या प्राप्त रकमेतून अतिरिक्त कामाचे उर्वरित बिल अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार मौजे देहरे येथे (साखळी क्रमांक १५३/६००) रस्ता व रस्त्याच्या जवळ व समांतर असणारा रेल्वेमार्ग ओलांडण्यासाठी करण्यात येणा-या भुयारी मार्गामध्ये अहमदनगर महानगरपालिका यांची पाणी पुरवठा करणारी जलवाहिनीची पाईप लाईन स्थलांतर करणे या कामा करीता ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद मा.मंत्री (सां.बा.)(सार्वजनिक उपक्रम वगळून ) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीतील "निर्णय/ निर्देश" प्रमाणे अंशदान स्वरूपात ठेवण्यास आलेल्या रक्कमे वरील व्याज रू.८२.१८ लक्ष वापरण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच व्याजाच्या रक्कमेतून अतिरिक्त कामाचे बिल अदा करणेस व रू.८२.१८ लक्ष व्याजाच्या रक्कमेतून अतिरिक्त कामाचे बिल अदा केले नंतर उर्वरित रक्कम रू.५१.६५ लक्ष सार्व.बांधकाम विभागाकडून म.न.पा.स उपलब्ध होणा-या प्राप्त रकमेतून अतिरिक्त कामाचे उर्वरित बिल अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- परसराम गायकवाड सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

**विषय क्रमांक : ४८** **दिनांक :- २४/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ ई - निविदा क्र.७९३७९२ प्रभाग क्र.१४ मधील पवार चाळ ते तांबे घर ते भोसले घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. या निविदेच्या मंजुरीबाबत करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयाबाबत खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१)प्रशासकीय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांची दि.२८/०३/२०२२.

२)ई - निविदा क्रमांक :- ७९३७९२/ सन २०२२-२३ दि.२९/०४/२०२२

३)निविदा विक्री कालावधी :- दि.२९/०४/२०२२ ते दि.१३/०५/२०२२

४)निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.२९/०४/२०२२ ते दि.१३/०५/२०२२

५)निविदा उघडणेचा दिनांक :- दि.१७/०५/२०२२

६)कामाची मुदत :- ०६ महिने

७)प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील :- दि.३०/०५/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | सर्वात कमीचे निविदाधारक | निविदेमध्ये भरलेला दर (निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७९३७९२ | प्र.क्र.१४ मधील पवार चाळ ते तांबे घर ते भोसले घरापर्यत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे | ३१,५५,५८३/- | श्री.रोहीत रत्ना अंधारे अहमदनगर | ५.००% जादा दराने | श्री.रोहीत रत्ना अंधारे अहमदनगर<br>-------------<br>निविदा दरापेक्षा ५.००% जादा दराने |
| | | | श्री.चेतन मारूती जाधव, अहमदनगर | १०.००% जादा दराने | |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक श्री.रोहीत रत्ना अंधारे,अहमदनगर यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा ५.००% जादा दराने आलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.तथापी सदर कामाचे अंदाजपत्रक सन २०२१-२२ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असल्याने जादा दराची निविदा मंजूर करणे उचित नाही.त्यामुळे कमी दराचे निविदाधारकास वाटाघाटीसाठी बोलविणे योग्य आहे.

तरी श्री.रोहित रत्ना अंधारे ,अहमदनगर यांना निविदा दराच्या वाटाघाटीसाठी बोलविण्यास आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील "ब" प्रमाणे कार्यवाही करणे उचित वाटते.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "ब" प्रमाणे वाटाघाटीसाठी बोलविण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त(सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार निविदा समितीसमोर वाटाघाटीसाठी बोलविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची स्वाक्षरी.

यावर मा.उप- अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,विनंती रिपोर्ट की,उक्त विषयांकित कामाच्या निविदेमध्ये आलेल्या निविदा दारापेक्षा ५.००% जादाचे दराबाबत निविदाधारकाने सदर काम निविदा दराने करणेबाबत संदर्भिय क्र.२ नुसार कळविले.त्यानुसार सदरबाबत दि.१४/०६/२०२२ रोजीच्या मा.निविदा छाननी समितीमध्ये सदर काम निविदा देणेस शिफारस केलेली आहे.

तरी निविदाधारक श्री.रोहीत रत्ना अंधारे ,अहमदनगर यांचा अर्ज व मा.छाननी समितीने केलेल्या शिफारसीनुसार सदर काम निविदा दराने मंजूर करणेस्तव सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केले नुसार "अ" छाननी समितीच्या शिफारशी नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त(सा) यांचा अभिप्राय की,छाननी समितीच्या शिफारशीनुसार निविदा दराने निविदा मंजूरीस्तव मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

सभापती साहेब :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ ई - निविदा क्र.७९३७९२ प्रभाग क्र.१४ मधील पवार चाळ ते तांबे घर ते भोसले घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. या निविदेच्या मंजुरीबाबत करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट वचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.परशुराम गायकवाड :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ ई - निविदा क्र.७९३७९२ प्रभाग क्र.१४ मधील पवार चाळ ते तांबे घर ते भोसले घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. या कामाचे निविदाधारक श्री.रोहीत रत्ना अंधारे ,अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोट्र नुसार साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ ई - निविदा क्र.७९३७९२ प्रभाग क्र.१४ मधील पवार चाळ ते तांबे घर ते भोसले घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. या कामाचे निविदाधारक श्री.रोहीत रत्ना अंधारे ,अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

---

**विषय क्रमांक : ४९** **दिनांक :- २४/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना सन २०२१-२०२२ ई निविदा क्रं.७९०५२५ अंतर्गत प्रभाग क्र.१४ मधील विनायकनगर येथील नगर-पुणे हायवे ते वैष्णव माता मंदीर ते किशोर उपाध्ये घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण या निविदेच्या मंजुरी बाबत. ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयाबाबत खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१)प्रशासकीय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांची दि.२४/०३/२०२२.
२)ई - निविदा क्रमांक :- ७९०५२५/ सन २०२२-२३ दि.२४/०३/२०२२
३)निविदा विक्री कालावधी :- दि.१८/०४/२०२२ ते दि.१२/०५/२०२२
४)निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.१८/०४/२०२२ ते दि.१२/०५/२०२२
५)निविदा उघडणेचा दिनांक :- दि.१७/०५/२०२२
६)कामाची मुदत :- ०६ महिने
७)प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील :- दि.३०/०५/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | सर्वात कमीचे निविदाधारक | निविदेमध्ये भरलेला दर (निविदा दरापेक्षा) | |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७९०५२५ | प्रभाग क्र.१४ मधील विनायकनगर येथील नगर-पुणे हायवे ते वैष्णव माता मंदीर ते किशोर उपाध्ये घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | ८७,८८,५२६/- | श्री.रोहीत रत्ना अंधारे अहमदनगर | ६.००% जादा दराने | श्री.रोहीत रत्ना अंधारे अहमदनगर |
| | | | श्री.चेतन मारूती जाधव, अहमदनगर | १२.००% जादा दराने | निविदा दरापेक्षा ६.००% जादा दराने |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक श्री.रोहीत रत्ना अंधारे,अहमदनगर यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा ६.००% जादा दराने आलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.तथापी सदर कामाचे

अंदाजपत्रक सन २०२१-२२ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असल्याने जादा दराची निविदा मंजूर करणे उचित नाही.त्यामुळे कमी दराचे निविदाधारकास वाटाघाटीसाठी बोलविणे योग्य आहे.

तरी श्री.रोहित रत्ना अंधारे ,अहमदनगर यांना निविदा दराच्या वाटाघाटीसाठी बोलविण्यास आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील "ब" प्रमाणे कार्यवाही करणे उचित वाटते.आदेशार्थ

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "ब" प्रमाणे वाटाघाटीसाठी बोलविण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त(सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "ब" प्रमाणे निविदा समितीसमोर वाटाघाटीसाठी बोलविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची स्वाक्षरी.

यावर मा.उप- अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,विनंती रिपोर्ट की,उक्त विषयांकित कामाच्या निविदेमध्ये आलेल्या निविदा दारापेक्षा ६.००% जादाचे दराबाबत निविदाधारकाने सदर काम निविदा दराने करणेबाबत संदर्भिय क्र.२ नुसार कळविले.त्यानुसार सदरबाबत दि.१४/०६/२०२२ रोजीच्या मा.निविदा छाननी समितीमध्ये सदर काम निविदा देणेस शिफारस केलेली आहे.

तरी निविदाधारक श्री.रोहीत रत्ना अंधारे ,अहमदनगर यांचा अर्ज व मा.छाननी समितीने केलेल्या शिफारसीनुसार सदर काम निविदा दराने मंजूर करणेस्तव सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केले नुसार "अ" छाननी समितीच्या शिफारशी नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त(सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार छाननी समितीच्या शिफारशीनुसार निविदा दराने निविदा मंजूरीस्तव मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

सभापती साहेब :- नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना सन २०२१-२०२२ ई निविदा क्रं.७९०५२५ अंतर्गत प्रभाग क्र.१४ मधील विनायकनगर येथील नगर-पुणे हायवे ते वैष्णव माता मंदीर ते किशोर उपाध्ये घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण या निविदेच्या मंजुरी बाबत. ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट वचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना सन २०२१-२०२२ ई निविदा क्रं.७९०५२५ अंतर्गत प्रभाग क्र.१४ मधील विनायकनगर येथील नगर-पुणे हायवे ते वैष्णव माता मंदीर ते किशोर उपाध्ये घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण या कामाचे निविदाधारक श्री.रोहीत रत्ना अंधारे,अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोट्र नुसार नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना सन २०२१-२०२२ ई निविदा क्रं.७९०५२५ अंतर्गत प्रभाग क्र.१४ मधील विनायकनगर येथील नगर-पुणे हायवे ते वैष्णव माता मंदीर ते किशोर उपाध्ये घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण या कामाचे निविदाधारक श्री.रोहीत रत्ना अंधारे,अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

**विषय क्रमांक : ५०** **दिनांक :- २४/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** भारतत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय.विकास योजना सन २०२१-२०२२ अंतर्गत ई-निविदा क्र.७८८९९७ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वस्ती परिसरातील रस्ते विकसीत करणे या निविदेच्या मंजुरीबाबत करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयाबाबत खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१)प्रशासकीय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांची दि.

२)ई - निविदा क्रमांक :- ७८८९९७/ सन २०२२-२३ दि.११/०४/२०२२

३)निविदा विक्री कालावधी :- दि.११/०४/२०२२ ते दि.०५/०५/२०२२

४)निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.११/०४/२०२२ ते दि.०५/०५/२०२२

५)निविदा उघडणेचा दिनांक :- दि.०९/०५/२०२२

६)कामाची मुदत :- ०६ महिने

७)प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील :- दि.३०/०५/२०२२ व १४/०६/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | सर्वात कमीचे निविदाधारक | निविदेमध्ये भरलेला दर (निविदा दरापेक्षा) | |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७८८९९७ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वस्ती परिसरातील रस्ते विकसीत करणे | ८७,९१,६८७/- | मे.एस.एफ शेख कंन्स्ट्रक्शन अहमदनगर | १५.००% जादा दराने | मे.गुलशन कंन्स्ट्रक्शन अहमदनगर |
| | | | मे.गुलशन कंन्स्ट्रक्शन अहमदनगर | १२.००% जादा दराने | निविदा दरापेक्षा १२.००% जादा दराने |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक मे.गुलशन कंन्स्ट्रक्शन,अहमदनगर यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा १२.००% जादा दराने आलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.तथापी सदर कामाचे

अंदाजपत्रक सन २०२१-२२ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असल्याने जादा दराची निविदा मंजूर करणे उचित नाही.

त्यामुळे कमी दराचे निविदाधारकास मा.आयुक्त यांचे मान्यतेने दि.१४/०६/२०२२ रोजी छाननी समिती समोर वाटाघाटीसाठी बोलविले असता मे.गुलशन कंन्स्ट्रक्शन अहमदनगर यांनी दि.१४/०६/२०२२ रोजी पत्र देवून सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास तयार असले बाबत लेखी पत्र दिले आहे.

तरी मे.गुलशन कंन्स्ट्रक्शन ,अहमदनगर यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने करणेस तयार असल्याने निविदा मा.स्थायी समितीपुढे मंजूरीस्तव पाठविणेस रिपोर्ट मान्यतेस्तव सविनय सादर

येणे प्रमाणे उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,संबंधित ठेकेदाराचे ५००/- रू.चे प्रतिज्ञापत्र दिसून येत नाही.विभागाने खात्री करावी.उप - अभियंता व शहर अभियंता यांनी प्रस्तावित केले प्रमाणे "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस मंजूरीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त(सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार निविदा दराची निविदा निर्णयास्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची स्वाक्षरी.

यावर मा.उप- अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,विनंती रिपोर्ट की,उक्त विषयांकित कामाच्या निविदेमध्ये आलेल्या निविदा दारापेक्षा ६.००% जादाचे दराबाबत निविदाधारकाने सदर काम निविदा दराने करणेबाबत संदर्भिय क्र.२ नुसार कळविले.त्यानुसार सदरबाबत दि.१४/०६/२०२२ रोजीच्या मा.निविदा छाननी समितीमध्ये सदर काम निविदा देणेस शिफारस केलेली आहे.

तरी निविदाधारक मे.गुलशन कंन्स्ट्रक्शन ,अहमदनगर यांचा अर्ज व मा.छाननी समितीने केलेल्या शिफारसीनुसार सदर काम निविदा दराने मंजूर करणेस्तव सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केले नुसार "अ" छाननी समितीच्या शिफारशी नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त(सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार छाननी समितीच्या शिफारशीनुसार निविदा दराने निविदा मंजूरीस्तव मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

सभापती साहेब :- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय.विकास योजना सन २०२१-२०२२ अंतर्गत ई-निविदा क्र.७८८९९७ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वस्ती परिसरातील रस्ते विकसीत करणे या निविदेच्या मंजुरीबाबत करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट वचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय.विकास योजना सन २०२१-२०२२ अंतर्गत ई-निविदा क्र.७८८९९७ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वस्ती परिसरातील रस्ते विकसीत करणे या कामाचे निविदाधारक मे.गुलशन कंन्स्ट्रक्शन,अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय.विकास योजना सन २०२१-२०२२ अंतर्गत ई-निविदा क्र.७८८९९७ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वस्ती परिसरातील रस्ते विकसीत करणे या कामाचे निविदाधारक मे.गुलशन कंन्स्ट्रक्शन,अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४

**विषय क्रमांक : ५१** **दिनांक :- २४/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय.विकास योजना सन २०२१-२०२२ अंतर्गत ई-निविदा क्र.७८९०१२ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सोलापुर रोड लगतची केदारवस्तीची जलनिसारण व्यवस्था करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयाबाबत खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१)प्रशासकीय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांची दि.

२)ई - निविदा क्रमांक :- ७८९०१२/ सन २०२२-२३ दि.११/०४/२०२२

३)निविदा विक्री कालावधी :- दि.११/०४/२०२२ ते दि.०५/०५/२०२२

४)निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.११/०४/२०२२ ते दि.०५/०५/२०२२

५)निविदा उघडणेचा दिनांक :- दि.०९/०५/२०२२

६)कामाची मुदत :- ०६ महिने

७)प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील :- दि.३०/०५/२०२२ व १४/०६/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | सर्वात कमीचे निविदाधारक | निविदेमध्ये भरलेला दर (निविदा दरापेक्षा) | |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७८९०१२ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सोलापुर रोड लगतची केदारवस्तीची जलनिसारण व्यवस्था करणे बाबत | ७१,४१,५७५/- | श्री.रोहीत रत्ना अंधारे अहमदनगर<br>श्री.चेतन मारूती जाधव, अहमदनगर | ५.००% जादा दराने<br>१०.००% जादा दराने | श्री.रोहीत रत्ना अंधारे अहमदनगर<br>-------------<br>निविदा दरापेक्षा ५.००% जादा दराने |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक श्री.रोहीत रत्ना अंधारे अहमदनगर यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा ५.००% जादा दराने आलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.तथापी सदर कामाचे अंदाजपत्रक सन २०२१-२२ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असल्याने जादा दराची निविदा मंजूर करणे उचित नाही.

त्यामुळे कमी दराचे निविदाधारकास मा.आयुक्त यांचे मान्यतेने दि.१४/०६/२०२२ रोजी छाननी समिती समोर वाटाघाटीसाठी बोलविले असता श्री.रोहीत रत्ना अंधारे अहमदनगर यांनी दि.१४/०६/२०२२ रोजी पत्र देवून सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास तयार असले बाबत लेखी पत्र दिले आहे.

तरी श्री.रोहीत रत्ना अंधारे अहमदनगर यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने करणेस तयार असल्याने निविदा मा.स्थायी समितीपुढे मंजूरीस्तव पाठविणेस रिपोर्ट मान्यतेस्तव सविनय सादर

येणे प्रमाणे उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,उप - अभियंता व शहर अभियंता यांनी प्रस्तावित केले प्रमाणे "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस मंजूरीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त(सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार निविदा दराने निविदा मंजूरीस्तव मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

सभापती साहेब :- भारतत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय.विकास योजना सन २०२१-२०२२ अंतर्गत ई-निविदा क्र.७८९०१२ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सोलापुर रोड लगतची केदारवस्तीची जलनिसारण व्यवस्था करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट वचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- भारतत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय.विकास योजना सन २०२१-२०२२ अंतर्गत ई-निविदा क्र.७८९०१२ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सोलापुर रोड लगतची केदारवस्तीची जलनिसारण व्यवस्था करणे या कामाचे निविदाधारक श्री.रोहीत रत्ना अंधारे अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार भारतत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय.विकास योजना सन २०२१-२०२२ अंतर्गत ई-निविदा क्र.७८९०१२ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सोलापुर रोड लगतची केदारवस्तीची जलनिसारण व्यवस्था करणे या कामाचे निविदाधारक श्री.रोहीत रत्ना अंधारे अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४

**विषय क्रमांक : ५२** **दिनांक :- २४/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभागा करीता तात्पुरत्या स्वरूपात करारबध्द मानधनावर देविदास परभणे ,रक्तसंक्रमण अधिकारी ,पतंगे विश्वनाथ सर्जेराव,लॅब टेक्निशीयन ,अन्सारी ईबार तुनिसा,परिचारीका या पदावर पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**संदर्भ :-** १. रक्तपेढी विभाग जा.क्र.१६९ दि.८/११/२०२१ अन्वये
२. रक्तपेढी आवक क्र.११ ते १३ दिनांक ०२/०५/२०२२

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग

उपरोक्त विषयान्वये विनंती पुर्वक अहवाल देण्यात येतो की,रक्तपेढी विभागामध्ये खालील तक्त्यामध्ये दर्शविल्या प्रमाणे कर्मचारी तात्पुरत्या स्वरूपात रक्तपेढी विभागामध्ये मानधनावर काम करत असुन तक्त्यात नमुदकेल्या प्रमाणे अ.क्र.१ ते ३ यांचा कालावधी दि.३१/०५/२०२२ अखेर आहे.सदर कर्मचा-यांचे काम समाधानकारक असुन रक्तपेढी विभागासाठी सदर कर्मचा-यांची आवश्यकता आहे.

| अ.क्र | नांव | पद | मुदत संपन्याचा कालावधी | मासिक मानधन | सहामहिन्या करिता एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | देविदास परभणे | रक्तसंक्रमण अधिकारी | ३१/०५/२०२२ अखेर | १७,०००/- | १ ०२,०००/- |
| २ | पतंगे विश्वनाथ सर्जेराव | लॅब टेक्निशीयन | ३१/०५/२०२२ अखेर | १७,०००/- | १ ०२,०००/- |
| ३ | अन्सारी ईबार तुनिसा | परिचारीका | ३१/०५/२०२२ अखेर | २०,०००/- | १,२०,०००/- |
| | | | | एकुण :- | ३,२४,०००/- |

तरी उपरोक्त तक्त्यात नमुद केल्या प्रमाणे कर्मचा-यांना नियमा प्रमाणे तांत्रिक खंड देवून अ.क्र.१ ते ३ नियमाप्रमाणे तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.०४/०६/२०२२ पासुन पुढील सहा महिन्या करिता नियुक्ती देणेस व रू.१०० स्टॅम्प पेपरवर करारनामा करून घेणेस व त्या अनुशंगाने येणा-या रू.३,२४,०००/- च्या खर्चास व सदर चा खर्च लेखाशिर्षक रक्तपेढी कंत्राटी कर्मचारी मानधन सन २०२२-२०२३ या मधून करणेस मान्यतेस्तव सादर.

तसेच डॉ.वसुंधरा विनायक पाटिल ,रक्त संक्रमण अधिकारी यांचे ही नियुक्ती आदेश दि.३१/०५/२०२२ रोजी संपत आहे.त्यांना पुढील नियुक्ती आदेश नको असले बाबतचा त्यांनी अर्ज दिला आहे.त्यामुळे रिक्त होणा-या पदावर एक रक्त संक्रमण अधिकारी घेणे साठी वर्तमान पत्रात जाहिरात देणेस व निर्णयास्तव मा.स्थायी समितीकडे पाठविणेकामी मान्यतेस्तव सादर.

येणे प्रमाणे रक्तसंक्रमण अधिकारी यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,आदेशार्थ सादर.

मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.२००५/प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५/०८/२००५ मधील परि-०५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या

विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घेण्यात यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यावर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी. असे नमुद केले आहे.प्रस्तावित रक्तपेढी विभागाकडे कर्मचारी यांना पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून कार्यवाही करणे हरकत नाही.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,अंलेप/मुलेप यांच्या अभिप्रायानुसार आदेशार्थ सादर.

मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,"अ" प्रमाणे स्थायी समितीकडे प्रकरण सादर करणेस मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मागील सभेमध्ये वाढत्या कोरोना प्रार्दुभाव रोखण्या करीता लसिकरण वाढविणे तसेच डाटा एन्ट्री ऑपरेटर यांच्या जागा भरणे बाबत सुचित करण्यात आले होते.त्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही.त्यांच्या नियुक्त्या करा.

मा.वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- लॅब टेक्नीशियन ,डाटा एन्ट्री ऑपरेटर हे महालॅब कडून मिळालेले आहेत.आठ पदे मंजूर झालेली आहेत.त्यानुसार कामकाज सुरू आहे.

मा.सभापती साहेब :- महालॅब तर्फे भरण्यात आलेले टेक्नीशियन व डाटा एन्ट्री ऑपरेटर लवकर येत नाहीत.तसेच पुर्ण वेळ थांबत नाहीत.आपण आपले टेक्नीशियन भरलेतर महानगरपालिकेस त्यांचा जास्त उपयोग करून घेता येईल.

मा.वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- महालॅब तर्फे नेमणूक करण्यात आलेल्या टेक्नीशीय यांना तश्या सुचना देवून त्यांची वेळ वाढवून घेतो.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिके मार्फत करण्यात येणा-या नालेसफाईचे काम समाधान कारक होत नाही.२४ लाखामध्ये संपुर्ण काम होणार नाही.पुन्हा टेंडर काढावे लागेल.

मा.पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- महानगरपालका हद्दीमध्ये लहान मोठे मिळून २० ओढे व नाले आहेत.त्यांची लांबी ५५ किलोमीटर होते.सदरचे नाले हे वर्षातुन एकदाच पावसाळयापुर्वी साफसफाई केली जाते.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- आमच्या भागामध्ये नाले सफाई करतांना अर्धवट काम केलेले आहे.नाल्यातुन काढलेला गाळ तसाच पडून आहे.पाउस आल्यानंतर बाजुचा गाळ पुन्हा नाल्या ,ओढयात जाणार आहे.

मा.पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- ओढयानाल्यांची साफ सफाई कामा बाबत दि.२६रोजी ऑर्डर दिली असून संबंधित ठेकेदाराने दि.२७ तारखेला काम चालू केले आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- महानगरपालिका हद्दीतील कोणताही एक ओढा सफाईकरीता घेतल्यानंतर त्याची पुर्ण सफाई झाल्यानंतरच दुसरे काम सुरू करणे आवश्यक आहे.प्रत्येक ठिकाणी अर्धवट काम ठेवून दुसरे काम चालु करतात.वर्षानुवर्ष एकच ठेकेदार नियुक्त करण्यात येतो.

मा.सौ.वंदना ताठे :- पावसाळया पुर्वी नाले सफाई करणे आवश्यक आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- रू.२४ लाखामध्ये आजपर्यत कोणकोणती कामे झाली.

मा.पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- ब-याच ओढया व नाल्यांचे सफाईचे काम चालू आहे.काही ठिकाणी काम पुर्ण झाले आहे.यापुढे सदरील ठिकाणच्या सभासदांचे काम पुर्ण झाल्याबाबत पत्र घेवू.

मा.श्री.मुदस्सर शेख :- सफाई केल्यानंतर काढलेला गाळ उचलून नेला जात नाही.तसाच पडून रहातो.

मा.सभापती साहेब :- कामाच्या ठिकाणावरून गाळ काढला जात नाही.गाळ तसाच पडून रहाते.पावसाच्या पाण्याने गाळ पुन्हा नाल्यामध्ये जातो.मोठाले नाले असतील तर छोटे जे.सी.बी.मशीन काहीही काम करीत नाही.मोठया नाल्यामधील मध्य भागाचा गाळ तसाच राहतो पुर्ण साफ सफाई होत नाही.नाले सफाईचे टेंडर काढतांना ठेकेदाराकडे एल.आर.मशिननेच सफाईचे काम करून घेण्यात यावे.

मा.श्री.गणेश कवडे :- सफाईचे काम चालू झाल्यानंतर मशीन चे रेडिंग घेण्याचे काम कोणता कर्मचारी करतो.मा.जिल्हाधिकारी श्री.व्दिवेदी साहेब असतांना सीना नदिचे काम झाले होते.त्यावेळी संपुर्ण गाळ पेरी काढण्यात आल्या होत्या.आता त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण करून गाळपेरी करण्यात आलेल्या आहेत.

मा.पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- सीना नदीची हद्द पक्की केलेली नाही.संयुक्त मोजणी करून हद्द स्थीर करावी लागेल.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- सीना नदीची एकदा मोजणी झालेली आहे.पुन्हा पुन्हा मोजणी करण्याची आवश्यकता नाही.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे जे.सी.बी मशिन उपलब्ध आहेत,मोठमोठया ओढया नाल्यामध्ये जे.सी.बी.मशीन काम करू शकत नाहीत.परंतु छोटे- ओढे नाले महानगरपालिकेने सफाई करण्यास हरकत नाही.बोरूडे मळा या ठिकाणी सीना नदी फकत ५ ते १० फुट राहिलेली आहे.सदर ठिकाणी गाळ काढून रूंदीकरण करणे आवश्यक आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- पंचशील नगर मधील ओढयाचे सफाईचे काम झालेले नाही.पाउस आल्यानंतर नागरीकांच्या घरामध्ये पुराचे पाणी जाते.

मा.सभापती साहेब :- साफ सफाईचे काम करणा-या ठेकेदारास सुचना देवून एल.आर.मशिन उपलब्ध करून घेणे बाबत सुचना दयावी.रस्त्याच्या कडेला मशिन ठेवून संपुर्ण नाले ओढे साफ करता येतील.छोटया मशिनने आढयाच्या मध्यभागी गाळ तसाच रहातो.रू.२४ लाखामध्ये संपुर्ण काम होणार नाही.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- आपत्कालीन तरतुदीचा निधी या कामासाठी वापरण्यात यावा.

मा.उपायुक्त श्री.कुरे :- मा.आयुक्त साहेब यांची मंजूरी घेवून मा.स्थायी समितीच्या मंजूरीने काम करता येईल.

मा.सभापती साहेब :- रू.२४ लाखापेक्षा आणखी किती खर्च येवू शकतो.याचा रिपोर्ट दया.छोटया नाल्यांमध्ये महानगरपालिकेचे जे.सी.बी.मशिन वापरा.नागरीजवळील भागामध्ये सफाईचे काम लवकरात लवकर करा.जेणे करून पावसाचे पुराचे पाणी नागरीकांच्या घरामध्ये जाणार नाही.अशी ठिकाणे पाहून प्रधान्याने तेथील कामे करा.

रक्तपेढी विभाग प्रमुख डॉ.शेडाळे :- मा.सभापती साहेब सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये देविदास परभणे, रक्तसंक्रमण अधिकारी असे टायपिंग मिस्टेक झालेली असून,श्री देविदास परभणे यांचे पद टेक्नीकल सुपरवाझर आहे.तरी त्यांच्या पदनामामध्ये बदल करण्यात यावा हि विनंती.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच प्रस्तावातील पदनाम रक्तसंक्रमण अधिकारी ऐवजी टेक्नीकल सुपरवायझर करण्यास मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.रविंद्र बारसस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभागासाठी श्री.देविदास परभणे,टेक्नीकल सुपरवायझर,श्री.पतंगे विश्वनाथ सर्जेराव, लॅब टेक्निशीयन, अन्सारी ईबार तुनिसा,परिचारीका या पदावर

नियमा प्रमाणे तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.०४/०६/२०२२ पासुन मानधनावर पुढील सहा महिन्या करिता पुर्ननियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या प्रस्तावातील श्री.देविदास परभणे यांचे पदनाम रक्तसंक्रमण अधिकारी ऐवजी टेक्नीकल सुपरवायझर हे पदनाम बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभागासाठी श्री.देविदास परभणे,टेक्नीकल सुपरवायझर,श्री.पतंगे विश्वनाथ सर्जेराव, लॅब टेक्निशीयन, अन्सारी ईबार तुनिसा,परिचारीका या पदावर नियमा प्रमाणे तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.०४/०६/२०२२ पासुन मानधनावर पुढील सहा महिन्या करिता पुर्ननियुक्ती करण्यास तसेच या प्रस्तावातील श्री.देविदास परभणे यांचे पदनाम रक्तसंक्रमण अधिकारी ऐवजी टेक्नीकल सुपरवायझर हे पदनाम बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

**विषय क्रमांक : ५३** **दिनांक :- २४/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवेचे नगरदर्शन सहली बाबतचे बील अदा करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग

उपरोक्त विषयानुसार विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की,अहमदनगर महानगरपालिकेने पर्यटन स्थळे ऐतिहासिक स्थळे इत्यादी ठिकाणी भेटी देणे कामी अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा परिवहन उपक्रमातील बसेस नगर दर्शन अंतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

शहर बस सेवेतील बसेसव्दारे शहरातील नागरिकांना नगर - दर्शन अंतर्गत वेगवेगळया स्थळांना भेटी देणे कामी माहे ऑक्टोबर -२०२१ अंतर्गत प्रत्येक आठवडयातील शनिवार / रविवार एकुण १० दिवस मोफत उपलब्ध करून देण्यात आलेल्या होत्या.तथापी सदर बससेवा परिवहन उपक्रम अभिकर्ता संस्था चालवित असून संस्थेने १० दिवस इंधन व चालकासह बसेस दिलेल्या आहेत व याबाबतचे प्रतिदिन रू.५०००/- प्रमाणे १० दिवसाचे रू.५०,०००/- बील मिळणे कामी संदर्भीय पत्र क्र.२प्राप्त झालेले आहे.

अहमदनगर शहर बससेवा परिवहन उपक्रमातील बसेस नगर दर्शन अंतर्गत नागरीकांना उपलब्ध करणे कामी संदर्भिय क्र.१ अन्वये मा.महापौर यांनी देखील पत्राव्दारे कळविलेले आहे.यास्तव शहरातील नागरिकांसाठी बसेस माहे ऑक्टोबर २०२१ मध्ये १० दिवस मनपा मार्फत उपलब्ध केलेल्या असून संबंधित अभिकर्ता संस्था मे.दिपाली ट्रान्सपोर्ट यांनी बसेस इंधन चालकासह पुरविल्याने त्यांचे बील रक्कम रू.५०,०००/- अदा करणेस मंजूरीस्तव सादर.तसेच सदर रक्कम ५०,०००/- चा धनादेश मे.दिपाली ट्रान्सस्पोर्ट ,अहमदनगर यांचे नांवे काढणे बाबत म.न.पा.अकौंट विभागास आदेश होणेस विनंती.

येणे प्रमाणे वरिष्ठ लिपीक,मोटार व्हेईकल विभाग यांचा अहवाल असे.

यावर जल अभियांता यांचा अभिप्राय की,चर्चा करा.

यावर वरिष्ठ लिपीक,मोटार व्हेईकल विभाग यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,नगरदर्शन सहलीकरीता अभिकर्ता संस्थेने मे.दिपाली ट्रान्सपोर्ट यांच्या बसेस १० दिवस वापरलेल्या असून या बाबत रूपये ५०,०००/- चे बील व अर्ज इकडेस प्राप्त झालेले आहे.तद्नंतर प्रस्ताव सादर केला असता विभाग प्रमुख यांनी चर्चा करणेबाबत सुचविले आहे.चर्चे मध्ये प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचे दराची तुलना केली असता प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचे कडील प्रस्ताव क्र.५/२०१९ मधहल मंजूर वाहन भाडयाचे दर पाहिल असता बस आसन क्षमता २१ ते ३५ करीता १२ तास /१२५ कि.मी.करीता रूपये १६२५/-प्रति ४ कि.मी.साठी १ ली.इंधन पुरविणे प्रमाणे दर नमुर केलेले आहेत.मनपाचे इंधनासह वाहन चालकासह बसेस नगरदर्शन करिता वापरलेली आहे.तसेच मा.प्रादे.परिवहन प्राधिकरण यांचे कडील नमुद दर सन २०१९ मधील असून तद्नंतर इंधन भाववाढ जास्त प्रमाणात झालेली असून इंधन कर्मचारी वेतन इत्यादीमुळे खर्च जादा येत असल्याने अभिकर्त्याने म्हणले आहे.तसेच सदर बीलाबाबत चर्चेअंती अभिकर्ता संस्थेने बीलामधून रूपये ५०००/- कमी करीत असले बाबत मान्य करून तसे पत्र दिलेले आहे.

सबब नगरदर्शन कामी वापरणेत झालेल्या एकुण १० दिवसांचे बील रूपये ४५,०००/- बसभाडे अदा करणेकामी खर्चास व कामास मंजुरी मिळावी ही विनंती.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रादेशीक परिवहन प्राधिकरण यांचे कडील प्रस्ताव ५/२०१९च्या अटी व शर्तीची खात्री झाल्याचे अधिन राहून तसेच दिपाली ट्रान्सपोर्ट व मोटार व्हेईकल प्रमुख यांचे झालेल्या वाटाघाटी चर्चेनुसार विभागाने आपल्या स्तरावर उचित कार्यवाही करावी.(१ डिसेंबर २०१६ प्रमाणे दरपत्रके मागवून कार्यवाही करावी)

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,अंलेप/ मूलेप यांच्या अभिप्रायानुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,चर्चा ,आजपर्यत सर्व देयके प्रकरणात स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवेचे नगरदर्शन सहली बाबतचे बील अदा करणे ऑफिस रिपोर्ट बाबत माहिती सांगा.

मोटार व्हेईकल विभाग श्री.कांबळे :- महानगरपालिकेमार्फत नगरशहराच्या आजुबाजुस व शहरामध्ये असणा-या पर्यटन स्थळांना भेटी देणे करीता शहर बस सेवा उपक्रमातील एक बस उपलब्ध करून देण्यात आलेली होती.माहे ऑक्टोबर २०२१ मध्ये दहा दिवस उपलब्ध करून देण्यात आली होती.सदर दहादिवसाचे इंधन व चालकास बसभाडे रू.५०हजार झालेले आहे.खर्च मंजूरी करीता विषय मा.स्थायी समिती समोर ठेवण्यात आलेला आहे.

मा.सभापती साहेब :- सदर बसचे नियोजन कोणी केले आहे.कोणत्या नागरीकांना पर्यटन दाखविण्यात आले.

मोटार व्हेईकल विभाग श्री.कांबळे :- मोटार व्हेईकल विभागामार्फत फक्त बस उपलब्ध करून देण्यात आलेली होती.पुढील नियोजन श्री.नजान यांनी काम पाहिलेले आहे.पुढील माहिती त्यांचेकडून घेणे योग्य होईल.

श्री.शशिकांत नजान :- नागरीकांना शहरातील व आजुबाजुच्या परिसरातील पर्यटनस्थळ ,एतीहासीक स्थळे यांची माहिती व्हावी.या उद्देशाने सदर बस सेवेचे नियोजन करण्यात आले होते.सदर कामा करीता मला कोणत्याही प्रकारचे लेखी आदेश नव्हते.मा.आयुक्त साहेब यांचे तोंडी आदेशानुसार मी काम पाहिले ,माझा मोबाईल नंबर वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करून सदर सहलीबाबत माझ्याशी संपर्क साधन्याबाबत कळविण्याल आलेले होते.त्यानुसार ज्या नागरीकांनी माझ्याशी संपर्क केला त्यांना सदर सेवेचा लाभ देण्यात आलेला आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- सध्या महानगरपालिकेच्या आवारामध्ये राज्य परिवहन बस सेवे करीता इलेक्ट्रीक मार्फत चार्जीग पॅईट चालू करण्यात आलेला आहे.याचे बील कोण भरणार आहे.

मानधन अभियंता श्री.कोके :- सदरचा पॉइंट हा राज्य परिवहन महामंडाळा मार्फत उभारण्यात आलेला आहे.त्यांचे करीता सबमिटर बसविण्यात आलेले आहे.त्यानुसार येणारे लाईट बिल महामंडळ भरणार आहे.

मा.सभापती साहेब :- सदर ठिकाणचा चार्जीग पॉइंट हा तातडीने बदलण्यात यावा.चार्जीग करीता बस लावण्यानंतर येणा -जाण्या करीता रस्ता रहात नाही.ऑफिसच्या पाठीमागील पार्कीग मधील जागा देण्यात यावी.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- राज्य परिवहन महामंडळामार्फत तरकपुर डेपो येथे चार्जीग स्टेशन उभारण्याचे काम चालू आहे.विद्युल लाईन टाकणे कामी रस्ते खादाई करीता लागणारी परवानगी आपण त्यांना दिलेली आहे.थोडयाच दिवसांमध्ये चार्जीग स्टेशनचे काम पुर्ण झाल्यानंतर महानगरपालिकेच्या आवारातील चार्जीग पॉईट बंद करण्यात येणार आहे.

मा.श्री.विनीत पाउुलबुधे :- पर्यटन सहलीकरीता वापरण्यात आलेल्या बस सेवे बाबत माहिती देण्यात यावी.

श्री.शशिकांत नजान :- ऑक्टोबर २०२१ मध्ये ऐतिहासीक पर्यटन स्थळांना भेटी देण्या करीता एक बस घेण्यात आली होती.नागरीकांना विनामुल्य सेवा होती.३७५ लोकांनी सहभाग घेतला होता.र्वमान पत्रामध्ये निवेदन देवून सदर

बाबत लाभ घेण्याबाबत कळविण्यात आले होते.नागरीकांनी नांव नोंदणीकरून सदर सेवेचा लाभ घेतलेला आहे.

मा.सभापती साहेब :- नगरसेवकांना या बाबत कोणतीही कल्पना देण्यात आलेली नाही.आमच्या भागातील बोल्हेगांव ,नागापुर ,नालेगांव येथील किती नागरीक आले.तेथील नागरीकांना कोणत्याही प्रकारची कल्पना देण्यात आलेली नाही.नगरसेवकांना आशा सेवे बद्दलची पत्राव्दारे माहिती देण्यात यावी.या कामाचे कोणाचे आदेश होते.सर्व नागरीकांना याचा फायदा होणे आवश्यक होते.आम्ही पुन्हा मागणी केल्यानंतर सदर बस आम्हाला उपलब्ध करून देणार का?

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- अशा योजनांबाबत नगरसेवकांना लेखी पुर्व कल्पना देणे आवश्यक आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.रूपाली वारे :- शनिवार ,रविवार सुट्टीच्या दिवशी बस उपलब्ध करून दयावी.सदर बस बरोबर माहितगांर असणारा गाईड देण्यात यावा.म्हणजे नागरीकांना नगर शहराभोवती असणा-या पर्यटन स्थळा बाबत माहिती होईल.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवेचे नगरदर्शन सहली बाबतचे बील अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचे पुतळे बसविणे कामी होत असलेल्या विलंबाबाबत मा.स्थायी समितीस कारण विचारणा करणे करीता आलेल्या शिवप्रेमी शिष्टमंडळ यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

मा.सभापती साहेब :- छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचे पुतळे बसविणे कामी काय अडचण आहे या बाबत माहिती देण्यात यावी.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- अहमदनगर शहरामध्ये चार थोर महापुरूषांचे पुतळे बसविण्याचे काम चालू आहे.त्यामध्ये नविन महानगरपालिका प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ,प्रोफेसर कॉलनी येथे छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा ,महात्मा ज्योतीराव फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे बसविणे आहे.सदर पुतळे बसविणे कामी ऐकुण २२ प्रकारच्या परवानग्या,एन.ओ.सी.घेण्याचे काम चालू आहे.वरील चारही पुतळयांच्या जागा समक्ष दाखविण्यात आलेल्या आहेत.पुतळे तयार करण्याचे काम चालू आहे.छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा बसविणे कामी ,प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर समोरील खुली जागा निवडण्यात आलेली आहे.त्याचा प्रस्ताव

मा.महासभेने मंजूर केलेला आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे क्ले मॉडेल अंतीम टप्यात आलेले आहे.ते पुर्ण झाल्यानंतर कला संचालनालय महाराष्ट्र राज्य ,मुंबई यांना क्ले मॉडेल दाखवून त्यामध्ये अंतीम काही तृटी आल्यास त्यानुसार सुधारणा करून त्यांची अंतीम मंजूरी घेवून नंतर ब्रॅान्झ धातुचा पुतळा तयार करण्यात येणार आहे.त्याच बरोबर परवानगी घेण्याचेही कामकाज चालू आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा नेप्तीनाका चौक येथे गेल्या १५ वर्षापासुन बसविण्याची कार्यवाही चालू आहे.अदयापपर्यत पुतळा बसविण्यात आलेला नाही.पुणे ,मुंबई या सारख्या मोठमोठया शहरामध्ये रस्त्याच्या कडेला सर्वाना दिसेल अशा स्थीतीमध्ये पुतळे बसविले जातात.आपल्याच पुतळयांना बसविण्यासाठी एवढया अडचणी का येतात.१५ -१५ वर्ष पाठपुरावा करूनही पुतळा बसविला जात नाही.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- नेप्ती नाका चौक येथून राज्य मार्ग जात असल्याने त्या ठिकाणी पुतळा बसविण्यास परवानगी दिली नाही.

मा.सभापती साहेब :- छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज तसेच इतर ही थोर पुरूषांचे पुतळे बसविणे कामी येणा-या कायदेशीर अडचणींवर मात करणे करीता महानगर पालिकेने नियुक्त केलेले वकिलांच्या पॅनेल मधील दोन वकिल घेतले तर आपले परवानगीचे कायदेशीर काम विनाअडथळा पुर्ण होईल.पॅनेल वरील श्री.काळे व त्यांचे मदतीकरीता आणखी एक वकिल नेमण्यात यावे.

मा.श्री.गणेश कवडे :- छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचे पुतळे बसविणे कामी महानगरपालिकेची जागा आहे.त्याची देखभाल करणे करीता महानगरपालिका सक्षम आहे.आपल्या जागेला आपले वॉल कंम्पौड आहे.आपलेच जागेमध्ये पुतळे बसविणेस अडचण का?

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- नगर शहर हद्दीमध्ये बसविण्यात येणा-या थोर महापुरूषांच्या पुतळयांच्या जागा श्री.कातकडे यांना स्वतः दाखविलेल्या आहेत.सदर जागेची महानगरपालिकेची मालकी आहे.तसे उतारे उपलब्ध आहेत.

मा.श्री.गणेश कवडे :- या सर्व बाबी असतांना पुतळे बसविण्यास परवानगी का देत नाही.आपण सर्व स्थायी समिती सदस्य ,अधिकारी  जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे कडे समक्ष जावून विचारणा करू.सोबतच मा.महापौर,मा.उपमहापोर तसेच इतर पदाधिकारी यांची समवेत जावून विचारणा करू.

मा.सभापती साहेब :- सदर कामा करीता कायदेशीर वकील नेमणूक करा,त्यांना वेगळे मानधन दया.

म.न.पा.पॅनेल विधी तज्ञ ॲड.श्री.जोशी :- छत्रपती संभाजी महाराज पुतळा बसविणे कामाची फाईल आम्हाला पहायला मिळाली नाही.ज्या ठिकाणी पुतळा बसवायचा तेथील गाळे धारक यांचा जागेबाबत काहीतरी वाद चालू आहे.

मा.सभापती साहेब :- थोर महापुरूषांचे महानगरपालिकेच्या जागेत पुतळे बसविणे कामी गाळे धारकांची काही अडचण येत असेल तर ,सदरचे गाळे पाडून टाकण्यात यावेत.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- गाळे धारकांची जागा वेगळी आहे.व ज्या ठिकाणी पुतळा बसवावयाचा आहे ती जागा वेगळी आहे.गाळे धारकांच्या जागेचा आणि पुतळा बसविण्याच्या जागेचा काहीही संबंध नाही.

मा.सभापती साहेब :- पुतळे बसविण्याच्या परवानगी काढणे व इतर कामाकरीता ॲड.श्री.काळे ,ॲड.श्री.गांगर्डे ,ॲड.श्री.जोशी यांचे पॅनेल नेमणूक करा.त्यांना बाहेरगांवी जाणे येणे कामी प्रवास भत्ता याची महानगरपालिकेने तरतुद करावी.

म.न.पा.पॅनेल विधी तज्ञ ॲड.श्री.गांगर्डे :- छत्रपती शिवाजी महाराज ,छत्रपती संभाजी महाराज यांचे पुतळे बसविणे कामी कुठलाही वकिल कोणतीही फि अथवा मानधन घेणार नाही.

मा.श्री.गणेश कवडे :- महानगरपालिका हद्दीमध्ये येणा-या प्रत्येक महामार्गावर डिव्हायडर मधोमध असणा-या इलेक्ट्रीक पोलवर विविध प्रकारच्या जाहीराती केल्या जातात.या जाहिरात दारांकडून महानगरपालिका काही कर आकारणी करते का? या जाहिरातींमुळे नगरशहरात येणा-या प्रत्येक रस्त्याचे विद्रुपीकरण होत आहे.अशा इलेक्ट्रीक पोलवर ज्या कोणाला जाहिरात करावयाची असेल त्या जाहिरात दाराकडून त्याठिकाणी सुशोभीकरण व इतर कामे करून घेणे आवश्यक आहे.इलेक्ट्रीक विभागाने अशा जाहिरात दारांशी संपर्क करून पुढील कार्यवाही करणे योग्य होईल.

म.न.पा.पॅनेल विधी तज्ञ ॲड.श्री.बाबर :- छत्रपती शिवाजी महाराज तसेच छत्रपती संभाजी महाराज यांचे पुतळे बसविण्याचे काम गेल्या २० वर्षा पासून चालू आहे.यापुर्वीही पुतळे बसविणे बाबत मदत केलेली आहे.आता ही करू.सदर कामा करीता महानगरपालिकेकडून कोणताही खर्च घेतला जाणार नाही.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिका हद्दीम महानगरपालिकेच्या जागेत थोर महापुरषांचे पुतळे बसविणे कामी खुप दिरंगाई होत आहे.आज या सभागृहात पुतळयाचे निवेदन देणे कामी मोजकेच शिवप्रेमी हजर राहिलेले आहेत.या पुढे अशीच दिरंगाई होत गेल्यास या पेक्षा ही अधिक शिवप्रेमी या ठिकाणी येतील पुतळे बसविणे कामी तीन वकिलांचे पॅनेल नेमुण कामकाज करण्यात यावे.निवेदन देणे कामी आलेल्या सर्व शिवप्रेमींचे आभार मानतो.तसेच थोर पुरूषांचे पुतळे बसविणे कामी अधिकारी व पदाधिकारी यांनी एकत्र येवून लवकरात लवकर पुतळे बसविणे कामी लागणा-या परवानग्या घेवून पुतळे बसविले जातील अश्या पध्दतीने कार्यवाही करण्यात यावी.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर शहर बससेवा परिवहन उपक्रमातील बसेस नगर दर्शन अंतर्गत नागरीकांना उपलब्ध करणे कामी व मा.महापौर यांनी पत्राव्दारे कळविलेले नुसार शहरातील नागरिकांसाठी नगरदर्शन सहली करिता बसेस माहे ऑक्टोबर २०२१ मध्ये १० दिवस मनपा मार्फत उपलब्ध केलेल्या असून संबंधित अभिकर्ता संस्था मे.दिपाली ट्रान्सपोर्ट यांनी बसेस इंधन चालकासह पुरविल्याने त्यांचे बील अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार अहमदनगर शहरामध्ये चार थोर महापुरूषांचे पुतळे बसविण्याचे काम चालू आहे.त्यामध्ये नविन महानगरपालिका प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ,प्रोफेसर कॉलनी येथे छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा ,महात्मा ज्योतीराव फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे बसविणे आहे.सदर पुतळे बसविणे कामी ऐकुण २२ प्रकारच्या परवानग्या,एन.ओ.सी.घेण्याचे काम महानगरपालिकेमार्फत चालू आहे. थोर महापुरषांचे पुतळे बसविणे कामी खुप दिरंगाई होत असल्याने सर्व अधिकारी व सर्व पदाधिकारी यांनी एकत्र येवून लवकरात लवकर पुतळे बसविणे कामी लागणा-या परवानग्या करीता येणा-या अडचणी दुर करण्या करीता पाठपुरावा करावा.तसेच महानगरपालकेच्या विधीज्ञ पॅनलवरील ॲड. प्रसन्न एम.जोशी,ॲड.प्रसाद दिलीप गांगर्डे ,ॲड.महेश शरदराव काळे, यांची पुतळे बसविणे बाबत परवानग्या व एन.ओ.सी मिळविणे कामी नेमणूक करण्यात येत आहे.त्यांना बाहेरगांवी जाणे येणे कामी प्रवास भत्ता देण्याची तरतुद करावी.

नगर दर्शन अंतर्गत शनिवार ,रविवार सुट्टीच्या दिवशी बस उपलब्ध करून दयावी.सदर बस बरोबर माहितगांर असणारा गाईड उपलब्ध करून देण्यात यावा.म्हणजे नागरीकांना नगर शहराभोवती असणा-या पर्यटन स्थळा बाबत माहिती होईल.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

अनुमोदक :- मा.सौ.रूपाली वारे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका